शासन शुध्दीपत्रक - विभागीय आयुक्त, नागपूर कार्यालयाकरीता महसूल सज्जावरील तलाठ्यांच्या कार्यालयीन वापराकरीता घेतलेल्या खाजगी जागांच्या भाड्याच्या थकबाकी अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र.भाडेवाढ-२०१६/प्र.क्र.४८/ई-१०,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १ मार्च, २०१९

वाचा :- (१) शासन निर्णय क्र.भाडेवाढ/२०११/प्र.क्र.२८२/ई-१०, दि. ०५ जून, २०१३
(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. पूरक-२०१८/प्र.क्र.२१९/ब-१, दि.०६.१२.२०१८
(३) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.ससंले/बजेट/पुरक/कावि-१२८४/२०१८,
(४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.भाडेवाढ-२०१६/प्र.क्र.४८/ई-१०, दि.२१.०२.२०१९

प्रस्तावना :-

महसूल व वन विभाग दि. ०५ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये, महसूल सज्जांवरील तलाठ्यांच्या मुख्यालयी कार्यालयीन वापराकरीता घेतलेल्या खाजगी जागांच्या भाड्यांच्या रक्कमेत वाढ करुन नविन भाडे मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त, नागपूर कार्यालयाकरीता महसूल सज्जावरील तलाठ्यांच्या कार्यालयीन वापराकरीता घेतलेल्या खाजगी जागांच्या भाड्याच्या थकबाकीची रु.२००.०० लक्ष (दोन कोटी फक्त) इतकी रक्कम अदा करण्याच्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आलेली आहे. त्यानुषंगाने सदर मंजूरीच्या अनुषंगाने निधी वितरण करण्याची बाबा शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

विभागीय आयुक्त, नागपूर कार्यालयाकरीता महसूल सज्जावरील तलाठ्यांच्या कार्यालयीन वापराकरीता घेतलेल्या खाजगी जागांच्या भाड्याच्या थकबाकीची रु.२००.०० लक्ष (दोन कोटी फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यास शासन या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देत आहे.

२. या प्रयोजनासाठी मंजूर पुरवणी मागणीची रक्कम विभागीय आयुक्त, नागपूर यांना बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत असून विभागीय आयुक्त, नागपूर यांनी त्याच्या अधिनस्त असलेल्या संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना सदरची रक्कम वितरित करण्यासही संमती देण्यात येत आहे.

३. यासाठी होणारा खर्च “मागणी क्र.सी-१ २०५३- जिल्हा प्रशासन ९४ (०३) ग्राम अधिकारी ०९४० (०३) (०५) विभागीय आयुक्त, नागपूर दत्तमत (२०५३ ०३५१) १४- भाडेपट्टी व कर या लेखाशीर्षाखाली सन-२०१८-१९ या वित्तीय वर्षात मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५९/२०१९/व्यय-९, दिनांक ०६.०२.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१९०३०११६०२५२६११९ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Haridasrao Bhogle

Digitally signed by Santosh Haridasrao Bhogle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd6727259260b3d, cn=Santosh Haridasrao Bhogle
Date: 2019.03.01 16:06:04 +05'30'

(डॉ. संतोष भोगले)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
२) महालेखापाल-१ /२ (लेखा परीक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
३) जिल्हाधिकारी, नागपूर / वर्धा / चंद्रपूर / गडचिरोली / भंडारा / गोंदिया
४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
५) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर / वर्धा / चंद्रपूर / गडचिरोली / भंडारा / गोंदिया
६) वित्त विभाग (आ.पु.क. / व्यय-९ कार्यासन), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
७) अवर सचिव (कार्यासन ई-८), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) कार्यासन अधिकारी (ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) निवड नस्ती (कार्यासन ई-१०), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई